ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम
राज्याच्या किमान गरजा
कार्यक्रमामधून **"महाजल"**
योजना राबविण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००५/प्र.क्र.७४(१)/पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक ३० एप्रिल,२००५**

वाचा: (१) शासन निर्णय, पा.पु.वस्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै २०००.
(२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर २००१.

प्रस्तावना:

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत मागणी आधारित समूह सहभागाचे धोरण राज्यात दि.२७.७.२००० पासून राबविण्यास सुरुवात झाल्यानंतर बाह्य अर्थसहाय्य करणाऱ्या संस्थांनी व केंद्र शासनाने राज्यास ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमासाठी निधी उपलब्ध करुन दिला असून राज्यात जागतीक बँकेच्या अर्थसहाय्याने **"जलस्वराज्य"** प्रकल्प, **"आपलं पाणी"** प्रकल्प व जर्मन बँकेच्या अर्थसहाय्याने केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने **"स्वजलधारा"** योजना राज्यात राबविण्यात येत आहे.

२. बाह्य अर्थसहाय्यामधून अथवा केंद्रीय अर्थ सहाय्या मधून राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेस जलस्वराज्य, आपलं पाणी व स्वजलधारा अशी नावे दिली आहेत त्याप्रमाणे राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमामधून राबविण्यात येणाऱ्या योजनेसाठी स्वतंत्र नांव देऊन सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमामधून राबविण्यात येणारा ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रम हा यापुढे **"महाजल"** या नावाने राबविण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर कार्यक्रम संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णय दिनांक २७.७.२००० व ३.९.२००१ अन्वये घालून दिलेल्या निकषानुसार व मार्गदर्शक सुचनांनुसार राबविण्यात यावा.

३. सदर कार्यक्रमासाठी पुरेसा निधी उपलब्ध व्हावा म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हा विकास मंडळाकडून दरवर्षी पुरेशी तरतूद उपलब्ध होईल याची दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(सुधीर ठाकरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद (सर्व)
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा परिक्षा)
महालेखापाल, महाराष्ट्र -२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा,नवी मुंबई
उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे,औरंगाबाद, अमरावती व नागपूर
सर्व प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा
सर्व कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
सर्व तहसीलदार
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय, मुंबई
मंत्रालयातील इतर सर्व विभाग,
पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षीय अधिकारी व कार्यासने
निवडनस्ती, कार्यासन क्रमांक पापु-०७.

एच–461(ए) – 1ब.